महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८१ वे दिनांक : ०७/१०/२०२६ वार : बुधवार

## ‘सेवा फर्स्ट’मध्ये विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना राज्यस्तरीय व्यासपीठ




**मुंबई :** ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला प्रत्यक्ष नवोपक्रमाची दिशा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज’मध्ये महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग वाढविण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. विशेषतः जिल्हा परिषद आणि ग्रामीण भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत ही स्पर्धा पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शाळा आणि शासनाच्या विविध विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. केंद्रीय कौशल्य विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या बहुराज्यीय नवोपक्रम स्पर्धेत विद्यार्थी, विद्यार्थी गट, संशोधक, प्राध्यापक, स्टार्टअप्स, एमएसएमई, कंपन्या, सामाजिक संस्था, शैक्षणिक व संशोधन संस्था यांच्यासह विविध क्षेत्रांतील नवोन्मेषकांना सहभागी होता येणार आहे. महाराष्ट्रात या स्पर्धेचा विस्तार शालेय स्तरापर्यंत करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग प्रयत्नशील आहे. या संदर्भात मंत्रालयात सोलापूर येथील स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या प्रतिनिधींसोबत बैठक झाली. यावेळी मंत्री लोढा यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या समस्या सोडविण्याच्या क्षमतेचा अधिकाधिक वापर करण्याची गरज व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धराम माशाळे आणि बाळासाहेब वाघ यावेळी उपस्थित होते. ‘सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज’साठी 21 सप्टेंबरपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून 17 ऑक्टोबर 2026 पर्यंत अर्ज करता येणार आहेत. विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष समस्या ओळखून त्यावर व्यवहार्य आणि नाविन्यपूर्ण उपाय सुचविणाऱ्या कल्पनांना या स्पर्धेत संधी दिली जाणार आहे. मंत्री लोढा यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या परिसरातील समस्या समजून घेण्याची आणि त्यावर स्वतःच्या कल्पकतेतून उपाय शोधण्याची मोठी क्षमता आहे. मात्र अनेकदा या कल्पना शालेय प्रकल्प किंवा प्रदर्शनांपुरत्याच मर्यादित राहतात. विद्यार्थ्यांच्या या कल्पनांना प्रत्यक्ष समाजोपयोगी नवकल्पनांमध्ये रूपांतरित करण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. ‘सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज’च्या माध्यमातून ही संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे विजेत्यांना केवळ बक्षीस देऊन थांबण्यात येणार नाही. स्पर्धेतील 10 प्रमुख क्षेत्रांमधील प्रत्येकी 5 उपक्षेत्रांमधून एकूण 50 विजेत्यांची निवड केली जाणार आहे. या विजेत्यांना प्रत्येकी 10 लाख रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मांडलेल्या कल्पनांना प्रत्यक्ष अंमलबजावणीची संधी मिळणार आहे. एखाद्या स्थानिक समस्येवर विद्यार्थ्याने सुचविलेला उपाय निवडला गेल्यास तो केवळ कागदावरील संकल्पना न राहता समाजाच्या उपयोगासाठी प्रत्यक्षात आणण्याची शक्यता निर्माण होणार आहे. शेती, पाणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण आणि वाहतूक यांसारख्या क्षेत्रांमध्ये ग्रामीण भागासह सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण उपाय शोधावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर दररोज जाणवणाऱ्या छोट्या समस्यांमधूनही मोठ्या नवकल्पना निर्माण होऊ शकतात. पाण्याची बचत, शेतीतील खर्च कमी करणे, शेतमाल साठवणूक, ग्रामीण आरोग्यसेवा, शाळांमधील शिक्षण अधिक प्रभावी करणे, कचरा व्यवस्थापन किंवा सार्वजनिक वाहतूक यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांना काम करता येणार आहे. ग्रामीण आणि जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत स्पर्धेची माहिती पोहोचविण्यात स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे कल्पना असल्या तरी त्या व्यवस्थित मांडणे, त्यावर प्रकल्प विकसित करणे आणि स्पर्धेसाठी अर्ज सादर करणे याबाबत त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

## 'सामान्यांसाठी जिवंतपणी मरण पत्करायला निघालोय



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात विधान परिषदेच्या निवडणुकांचे वेध लागले असून, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांमध्ये मोठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत आता केवळ राजकीय नेतेच नाही, तर सामाजिक कार्यकर्ते, तरुण उद्योजक आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही मैदानात उतरल्याने मोठी चुरस निर्माण झाली आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात सामाजिक कार्यकर्ते रमेश पाटील यांनी अनोख्या पद्धतीने आपला अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यांनी थेट तिरडीवर जात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच 'सामान्य लोकांवर ही मरायची वेळ आली आहे, म्हणून चाललो अर्ज भरायला तुमच्यासाठी जिवंत पणे मरायला,' असे कॅप्शनही त्यांनी लिहिले आहे. रमेश पाटील यांचा तिरडीवर उमेदवारी अर्ज दाखल करायला जतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या अनोख्या पद्धतीने सगळ्यांचेच लक्ष त्यांनी वेधले आहे. तसेच काही दिवसांपूर्वी रमेश पाटील यांनी मतदारांना आवाहन देखील केले की, तुम्हाला खरेच मी कामाचा माणूस वाटत असेल तर मला निवडून देण्यास मदत करा, असे त्यांनी म्हटले होते. काही दिवसांपूर्वी रमेश पाटील यांनी मतदारांना आवाहन करताना म्हटले होते की, आपल्या सर्वांच्या जीवनात पदवी हे केवळ एक कागदाचे प्रमाणपत्र नाही, तर ती प्रगतीची आणि समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची एक गुरुकिल्ली आहे. मी नेहमीच मानत आलो आहे की, शिक्षण हे आपल्याला विचारांची प्रगल्भता देते आणि जबाबदारीने काम करण्याची ऊर्जा देते. आज मी एका महत्त्वपूर्ण कारणासाठी आपल्या सर्वांसमोर आलो आहे. पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ही केवळ एक राजकीय लढाई नसून, ती सुशिक्षित समाजाच्या विचारांची आणि अपेक्षांची एक परखड परीक्षा आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६


## वन्यजीव सप्ताहानिमित्त अंजना स्कूल ऑफ एक्सलन्समध्ये वन विभागाच्या वतीने जनजागृती शिबिराचे आयोजन



**दौलताबाद (जावेद अहमद) :** निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वन आणि वन्यजीवांचे संरक्षण अत्यंत आवश्यक असून, "वन वाचवा, वन्यजीव वाचवा" हा संदेश प्रत्येकाने आपल्या आचरणातून पुढे नेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. भारतभर दरवर्षी २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स, गंगापूर येथे मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी वन विभागाच्या वतीने एका विशेष जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे वन्यजीव, त्यांचे अधिवास, पर्यावरणातील त्यांचे महत्त्व तसेच मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहजीवन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.वन्यजीवांचे संरक्षण म्हणजे निसर्गाचे संरक्षणकार्यक्रमात बोलताना मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक यांनी विविध वन्यजीवांच्या जीवनशैलीबरोबरच निसर्गातील अन्नसाखळी आणि पर्यावरणीय समतोलामध्ये वन्यजीवांचे असलेले महत्त्व सोप्या भाषेत स्पष्ट केले. वन्यजीव हे केवळ जंगलातील प्राणी नसून ते संपूर्ण पर्यावरणीय व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अन्नसाखळी, जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल टिकवण्यासाठी वन्यजीवांचे अस्तित्व अत्यावश्यक आहे. त्यामुळे वन्यजीवांची शिकार, तस्करी आणि त्यांच्या अधिवासाचा नाश रोखण्यासाठी भावी पिढीने आणि समाजाने सक्रिय सहभाग घेण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या प्रसंगी उपवनसंरक्षक: सुवर्णा माने,सहायक वनसंरक्षक आशा चव्हाण,मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक, डॉ. चिन्मय पाठक,वनपरिक्षेत्र अधिकारी (खुलताबाद) निखिल देशमुख,अंजना स्कूल व्यवस्थापक देव साठे,वनपाल मनोज उदार, सुधीर धवल, पंढरीनाथ शिंदे, रामनाथ जगधणे, राम मुळे यांच्यासह वन विभागातील इतर अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संरक्षणाविषयी प्रचंड उत्साह आणि जागृती पाहायला मिळाली.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व ताण-तणाव व्यवस्थापनावर मार्गदर्शन



**जालना :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, आर्थिक व्यवहारांबाबत जागरूकता, मानसिक स्वास्थ्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उद्देशाने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथील आरोग्य समिती व रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता, ताण-तणाव व्यवस्थापन, जीवनशैली, सॉफ्ट स्किल्स आणि भावनिक बुद्धिमत्ता या विषयांवर विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्र. प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा रो. मधूलता भक्कड, सचिव रो. डॉ. अतुल जिंतूरकर, आरोग्य समितीचे प्रमुख डॉ. भगवानसिंग डोभाळ, यांची उपस्थिती होती.रो. तथा चार्टर्ड अकाउंटंट पियुष अग्रवाल यांनी 'आर्थिक साक्षरता' या विषयावर मार्गदर्शन करताना आर्थिक नियोजन, बचत, खर्चाचे व्यवस्थापन आणि आर्थिक शिस्तीचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच आर्थिक व्यवहारांबाबत सजग राहून भविष्यासाठी योग्य नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.रो. विकास कदम यांनी 'ताण-तणाव व्यवस्थापन आणि जीवनशैली' या विषयावर मार्गदर्शन केले. अभ्यास, परीक्षा, करिअर आणि वैयक्तिक आयुष्यातील ताणतणाव हाताळण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि संतुलित जीवनशैली आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.रो. महेश माळी यांनी 'सॉफ्ट स्किल्स आणि भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रभावी संवाद, नेतृत्व, संघभावना, निर्णयक्षमता, वेळेचे व्यवस्थापन आणि भावनांचे योग्य नियमन ही कौशल्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक यशासाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजन, मानसिक स्वास्थ्य, आरोग्यपूर्ण जीवनशैली आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक जीवनोपयोगी कौशल्यांची उपयुक्त माहिती मिळाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पवन देशमुख यांनी केले, तर प्रा. डॉ. स्वाती पुरी यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. सुंदर वायाळ, श्री. रोहन वर्तले आणि श्री. सुरेश खरात यांनी परिश्रम घेतले.

## ॲथलेटिक्स स्पर्धेत राजीव गांधी महाविद्यालयातील अर्जुन नायमाने आणि संजना बहुरे यांचे उल्लेखनीय यश







**करमाड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत विनायकराव पाटील महाविद्यालय,वैजापूर येथे दि. ५ व ६ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.या स्पर्धेत महाविद्यालयाचा विद्यार्थी कु. अर्जुन नायमाने याने गोळाफेक (Shot Put) या क्रीडा प्रकारात दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. संजना बहुरे हिने ४०० मीटर धावणे व थाळीफेक (Discus Throw) या दोन्ही प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला.दोन्ही विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मणराव मनाळ, सचिव डॉ. सौ. शैलजा जोशी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे, उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर, प्रा. डॉ. किशोर काळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कु. अर्जुन नायमाने व कु. संजना बहुरे यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६


## शैक्षणिक क्षेत्रात पुरोगामी विचारांवर बंदी ? प्रा. शिवाजी वाठोरे

ज्या समाजधुरिनांनी अत्यंत कठीण काळात समाजाला समतेचा मार्ग दाखविला, जुन्या अनिष्ट परंपरांवर आपल्या लेखणी आणि वाणीने आसूड ओढले, त्या महामानवांचे साहित्य वाचून भावी पिढीतील हजारो अभ्यासकांना मार्ग गवसला. आजपावेतो राजकारणी - सत्ताधाऱ्यांनी या बाबीकडे आस्थापूर्वक बघितले. मात्र, अलीकडच्या काळात ज्या वृत्तीचे सत्ताधारी सत्तेत बसलेत, त्यांच्या अंगाचा तिळपापड होऊन जिथे कोठे संधी असेल तेथे - तेथे महामानवांच्या साहित्यास मोडतोड करून वाचकांसमोर ठेवणे, त्यास अनुल्लेखाने मारणे अशा तऱ्हेचे नीच कृत्य करण्याचे अनेक प्रयोग होत असल्याचे निदर्शनास येत आहे. महामानवांना विरोध करायचा. त्यात अपयश येत असेल तर त्यांना स्वीकारण्याचे नाटक करायचे आणि अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न करायचा, हा कुटील डाव सुरू आहे. I am the story हे एक्स ( x ) वरचं एक हॅण्डल. याचे ४८ हजार फॉलोअर्स आहेत म्हणे. जियो पॉलिटिक्स, हिस्ट्री, वेदा, सनातन आणि भारत हे विषय आपले विषय म्हणून सांगणारे हे हॅण्डल. परवा या हॅण्डलवर स्वतः चे नाव लपवून एकाने पोस्ट टाकली. (म्हणजे यांना स्वतः चे नाव लिहिण्यापेक्षा अजेंडा महत्त्वाचा वाटतो.) या हॅण्डलवरून म. फुले यांचे गुलामगिरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अन्हिलेशन ऑफ कास्ट, (जातीव्यवस्थेचे निर्मूलन) ह्या पुस्तकास अँटी हिंदू असे म्हटले गेले. हे विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकास डाव्यांचे प्रचारक ठरवले गेले. "फुले आंबेडकरी साहित्य म्हणजे 'विष' आहे, आपण आपल्या विद्यार्थ्यांत विष पेरतोय काय? पितृवाद संपवण्यापासून ते जात संपवण्यापर्यंत ब्राह्मण द्वेष शिकवतोय काय? " अशा आशयाची निनावी पोस्ट आहे ती. अर्थात, पोस्ट टाकणारी व्यक्ती कुणाचा बगलबच्चा आहे, हे सांगण्यासाठी कुण्या तत्त्ववेत्त्याची गरज नाही, त्याचे फॉलोअर्स कोण आहेत, ते सर्वश्रुत आहे. केंद्रीय विद्यापीठात अध्ययनासाठी असलेली ३५ पुस्तके. या पुस्तकात म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथासह अगेन्स्ट द मॅडलेस ऑफ मनू (शर्मिला रेगे), why I am not hindu (कांचा इल्लाय्या शेफर्ड), सावित्रीबाई फुले, पेरियार इ. व्ही. रामासामी, गेल आम्व्हेट, ब्रजमंजन मणी, आर. एस. शर्मा, उमा चक्रवर्ती, अशा अनेक पुरोगामी, समाजास उपकारक आणि प्रागतिक लेखन करणाऱ्या लेखकां च्या पुस्तकांचा समावेश आहे. भारतातील जातीव्यवस्था, शूद्रांची अवस्था यावर भाष्य करणारी ही सर्व पुस्तके मराठी वैचारिक विश्वात महत्त्वाची आणि बहुजनांचे सामाजिक अर्थकारण सांगणारी, फुले - शाहू - आंबेडकरी विचारांशी घट्ट नाते सांगणारी ही पुस्तके आहेत. सदरील पोस्टची लगेच २४ तासात दखल घेत थेट उच्च शिक्षण मंत्रालयातील राजकमल नावाच्या उच्च अधिकाऱ्याकडून केंद्रीय विद्यापीठास पत्र पाठवून "पंतप्रधान कार्यालयातून आलेल्या आदेशानुसार, असे कोर्स आपल्या विद्यापीठात सुरू आहेत, त्या विषयावर आपले मत कळवा आणि प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी तयार करून पीएमओ कार्यालयास पाठवा." असे फर्मान काढण्यात आले आहे. म्हणजे "तू पोस्ट टाक मग आम्ही विचारणा करतो." असे संगनमत आधीच ठरले होते की काय? अशी शंका घ्यायला वाव आहे. हे एम. ए. आणि एम. फिल.चे कोर्सेस आहेत. विद्यार्थ्यांनी प्रागतिक साहित्य वाचू नये. विद्यार्थ्यांनी विचार करू नये. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारू नयेत, असेच यांना वाटते का? कारण ते शिकले की प्रश्न विचारतात. प्रश्न विचारणे लोकशाहीला धरून आहे, हे मात्र ते सोयीने विसरतात. आता प्रश्न असा निर्माण होतो की, आजपावेतो कोणत्याही शासनकाळात अशी कोर्सेसची यादी देऊन विद्यार्थ्यांची विचारणा कोणत्याही प्रधानमंत्र्यास करावी वाटली नाही. ती आजच गरज का निर्माण झालेली आहे? याचाही साकल्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. म्हणजे किती खालच्या स्तरावर जाऊन खुनशी वृत्तीने सत्ताकारण करीत आहे ही मंडळी! विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात प्रागतिक विचाराचा समावेश होणे म्हणजे 'विष ' असे कसे काय म्हणता येईल? उच्च शिक्षणात उपलब्ध सर्वच विचारसरणीचा अभ्यास केल्यानंतरच कोणती विचारसरणी योग्य - अयोग्य, कोणत्या विचारसरणीचा स्वीकार करावा, हे त्या विद्यार्थ्यांना अभ्यासांती ठरवू द्या की. अशा प्रकारे त्यांची यादी मागवून त्यांच्यावर लक्ष ठेवणे म्हणजे त्या विद्यार्थ्यांत भीतीचे वातावरण निर्माण करणे नव्हे काय? त्यांची अध्ययनाची इच्छा मारणे नव्हे काय?म्हणजे आम्ही सांगतो तेच वाचा. आम्ही म्हणतो तेच बोला. आम्ही सांगतो तेच लिहा. असेच आहे हे सगळे. मागे एकदा हुकुमशहा जिनपिंग म्हणाला होता, "मी करतो तशीच कटिंग करा." त्यातलाच हा प्रकार म्हणावा लागेल. येथे लोकशाही मार्गाने निवडून जाऊन हुकूमशाही वृत्तीने सत्ताधारी वागत असतील तर हे अतीच झाले, हा तर सरळ - सरळ लोकशाहीवर घाला आहे, असेच म्हणावे लागेल.

**(लेखक ख्यातकीर्त समीक्षक, सामाजिक चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

## दरेगावच्या एस.पी. स्कूलचे आट्यापाट्यात राज्यात दुहेरी यश



**फुलंब्री :** छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय क्रीडा संकुलावर नुकत्याच पार पडलेल्या 19 वर्षे वयोगटातील आट्यापाट्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत एस.पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, दरेगाव (दरी), तालुका फुलंब्री, जिल्हा छत्रपती संभाजी नगर या विद्यालयाने इतिहास घडवला आहे.या स्पर्धेत विद्यालयाच्या मुलींच्या व मुलांच्या दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राज्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर दाखवलेल्या या दमदार कामगिरीमुळे सर्वत्र कौतुक होत आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य गजानन तायडे व सर्व शिक्षकवृंद यांनी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या यशस्वी खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक सतीश इंगळे व संदीप मालोदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.विजेते खेळाडू :मुलींचा संघ - निकिता मालोदे, सारिका मालोदे, संचिता भागवत, भारती पाचपुते, दिपाली कापरे, समृद्धी मालोदे, गायत्री मालोदे, सानिया शेख, जया अहिरे, प्राजक्ता मोहरे, संजना प्रधान, समीक्षा पवार.मुलांचा संघ - अभिषेक मालोदे, युवराज मालोदे, तन्मय मगरे, समर्थ मालोदे, आकाश मालोदे, युवराज मालोदे, गौरव फुके, विठ्ठल मालोदे, ओमकार मालोदे, सागर पवार, शुभम पोपळघट, हर्षद घाटे.

## उमरगा तालुक्यात आमदार बसवराज पाटील यांनी केली दुष्काळग्रस्त भागाची पाहणी



**मुरुम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) :** धाराशिव जिल्ह्यातील नाईचाकूर,बोरी,सावळसूर ता.उमरगा येथे दुष्काळग्रस्त भागाची विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शिवारात फिरून पिकांची अवस्था, पाण्याची उपलब्धता आणि दुष्काळामुळे बळीराजासमोर उभ्या राहिलेल्या अडचणींचा आढावा घेतला. पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तसेच आगामी हंगामाच्या दृष्टीने शेतकऱ्यांसमोरील अडचणी जाणून घेतल्या.शेतकऱ्यांना पाणी, चारा आणि आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. दुष्काळाच्या या कठीण काळात शेतकरी एकटा नाही; त्याच्या प्रत्येक अडचणीत त्याच्या पाठीशी देवाभाऊंचे महायुती सरकार खंबीरपणे उभे असल्याचे सांगून बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे पाटील म्हणाले. यावेळी नाईचाकूर येथील विजयकुमार सोनवणे, केशवराव पवार, रावसाहेब पवार, डॉ. दिलीप गरुड माणिक बापू पवार, सुरेश बाबळसुरे, शिवाजी पवार, सतीश पवार, राजेंद्र डिगोळे, रामभाऊ पवार, शरद पवार, कांत पवार, सतीश पाटील, ओम प्रकाश पवार, पांडुरंग पवार, रामभाऊ घाटे, भाऊराव कांबळे, बाबू कांबळे, कमलाकर मकाळे, चंद्रकांत स्वामी सरपंच, रूपमांगत पवार,भीमाशंकर पवार.बोरी येथील उपसरपंच विक्रम मदने,शिवाजीआबा फत्तेपुरे,विजयकुमार कांबळे, अभिजीत इंगळे, हरिभाऊ कांबळे, तानाजी खटके, शिवामाय होळकर, शिवाजी सूर्यवंशी, प्रकाशअण्णा मदने, संतोष फत्तेपूर, संतराम इंगळे, नितीन इंगळे, भरत मदने, सावळसुर येथील आकाश इंगळे, प्रेमनाथ सूर्यवंशी, भालचंद्र बिराजदार,बाळू मशाळ,ज्ञानेश्वर पाटील,शाम चिंचोळे,अविनाश सूर्यवंशी, गुंडू बिराजदार,संदीप पाटील,दिनकर सूर्यवंशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६


## डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयात गुणवंत आणि क्रीडापटुंचा सत्कार आणि फ्रेशर्स डे चे आयोजन



**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कामठी रोड येथे गुणवंत आणि क्रीडापटुंचा सत्कार आणि फ्रेशर्स डे चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संभाजी एस. भोसले, मा. संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ यांना निमंत्रित करण्यात आले. अध्यक्षस्थान महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी भूषविले. याप्रसंगी डॉ. चंद्रशेखर पाटील सांस्कृतिक विभाग प्रमुख व इतिहास विभाग प्रमुख आणि डॉ. सौरभ मोहोड संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांची विशेष उपस्थिती होती. हा गुणवंतांचा व क्रीडापटुंचा सत्कार सोहळा सांस्कृतिक विभाग आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर कला व मानव्यशास्त्र उन्हाळी 2025 परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त प्राविण्यप्राप्त 09 विद्यार्थाचा सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मागील सत्रात खासदार क्रीडा महोत्सव, विद्यापीठ अश्वमेध क्रीडा महोत्सव, राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि आंतर विद्यापीठ विविध क्रीडास्पर्धामध्ये विजयी खेळाडूंचा सत्कार देखील ट्रॅक सूट देऊन करण्यात आला. यासोबतच महाविद्यालयात बी. ए, बी. कॉम ( पदवी आणि पदव्युत्तर ) आणि बी. एस्सी प्रथम वर्षात प्रवेशित नवीन विद्यार्थ्यांना PPT च्या माध्यमातून महाविद्यालयाचे विविध विभाग,कार्य प्रणाली उपलब्ध शैक्षणिक आणि क्रीडा सुविधा ई. ची सविस्तर माहिती डॉ. सुशांत चिमणकर यांनी दिली. गुणवंत विद्यार्थी याची घोषणा डॉ. मनिषा नागदेव यांनी केली तर क्रीडा पटू सत्काराची घोषणा डॉ. सौरभ मोहोड यांनी केली. प्रास्ताविक भूमिका डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी विषद केली. प्रमुख अतिथी डॉ. संभाजी भोसले यांचा परिचय सभागृहास डॉ. अंकुश घाटे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमेध नागदेवे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. सौरभ मोहोड यांनी केले. कार्यक्रम महाविद्यालय प्रथेनुसार राष्ट्रगीताने संपन्न झाला.

## म. ज्यो. फुले विद्यालय पिशोर येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा:



**पिशोर (प्रतिनिधी) :** जिल्हा क्रीडा कार्यालय, तालुका क्रीडा समिती व पिशोर येथील म ज्यो फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा येथील म ज्यो फुले हायस्कूलच्या मैदानावर मंगळवारी (दि. ०६) सुरू झाली. मंगळवारी १४, १७, १९ वयोगटाच्या मुलांच्या व बुधवारी १४, १७, १९ मुलींच्या तालुकास्तरीय खो खो स्पर्धा पार पडणार आहेत. घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष के आर नवले यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन पार पडले. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, संस्थेचे संचालक काका आप्पा मोकासे, तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी, तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य व मार्गदर्शक प्रविण शिंदे, क्रीडा शिक्षक प्रशांत नवले, कडूबा चव्हाण, प्रशांत शेळके, रविकुमार सोन कांबळे, किशोर गवळी, स्वच्छंद गिरी, प्रा. विजय सोनवणे, योगेश नवले, राजू तडवी, सुरेश हिंजे इत्यादीसह विविध शाळेचे क्रीडा शिक्षक आदी उपस्थित होते. यात १९ वर्षे वयोगटात म ज्यो फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळ करत घवघवीत यश संपादन केले. त्यांची जिल्हा स्तरावर निवड झाली.या यशाबद्दल परिसरातून खेळाडूंचे कौतुक होत आहे.अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातून अनेक नामांकित शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला होता. म. ज्यो. फुले विद्यालयाच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच उत्कृष्ट चढाई आणि मजबूत संरक्षणाचा (डिफेन्स) नमुना पेश केला. अंतिम सामन्यात अत्यंत अटीतटीच्या लढतीत प्रतिस्पर्धी नवजीवन आश्रम शाळेच्या संघाला पराभूत करत विद्यालयाच्या संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक, क्रीडा शिक्षक आणि पिशोर ग्रामस्थांनी विजयी खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांचे अभिनंदन केले आहे. या विजयामुळे विद्यालयाच्या संघाची आता जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## सांगा ! मित्रांनो

गर्भ श्रीमंतीचा मार्ग,
कोणीतरी सांगा भाऊ.
आपणही त्याच वाटे,
श्रीमंतीचे गीत गाऊ. १

कशी वाढते संपत्ती ?
निवडून आल्यावर,
कसे होतात श्रीमंत ?
सत्ताधारी झाल्यावर. २

काय गणित असेल?
कोणता वाढतो भत्ता ?
पैसे वाढण्याचे केंद्र,
आहे का खरंच सत्ता ? ३

सत्तेसाठी होते इथे,
दोन गटात भांडण.
गोरगरिबांचे सदा,
होत राहील कांडण. ४

आज पर्यंत कोणाला,
लागलाच नाही पत्ता.
असा कोणता असतो,
गर्भ श्रीमंतीचा भत्ता. ५

सांगा मित्रांनो तुम्हीच,
मत पेटीतला फंडा.
कुठे सापडेल मला,
गर्भ श्रीमंतीचा अंडा. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६

## शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे शहाजी महाराज अध्यासन केंद्रास मान्यता



**कन्नड :** स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांच्या कार्य व कर्तुत्वाची सुरुवात ही वेरूळ परिसरात झाली या परिसरातील कन्नड, बनशेंद्रा, जातेगाव व अंधानेर हे शहाजी महाराजांच्या जहागिरीची गावे होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या अनुषंगाने नव संशोधक व इतिहास अभ्यासाकाना या परिसराची ओळख व्हावी व भोसले घराण्याचा अभ्यास व्हावा या उद्देशाने शहाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना शिवाजी महाविद्यालय कन्नड इतिहास विभाग अंतर्गत व्हावी असा प्रस्ताव महाविद्यालयाकडे देण्यात आला होता. या प्रस्तावास श्री, छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या बैठकीत नुकतीच मान्यता देऊन अध्यासन केंद्र सुरू करण्यास संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. मानसिंह बाळासाहेब पवार, संस्थेचे अध्यक्ष सौ. संजीवनी मानसिंह पवार, संस्थेचे सचिव मा. श्री. चंद्रकांत देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. कृष्णा पाटील निकम,संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. आनंदराव महाले व सर्व सन्माननीय संचालक मंडळ, पदाधिकारी यांनी दिली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उप प्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर यांनी दिली. लवकरच या अध्यासन केंद्राचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ. कारभारी भानुसे, व डॉ. प्रकाश महाजन यांनी सांगितले

## बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा तालुक्यात प्रथम क्रमांक; जिल्हास्तरासाठी निवड



*फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथे येथे तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला याप्रसंगी संघाचे अभिनंदन करताना मुख्याध्यापिका, क्रीडाशिक्षक*

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.शाळेच्या विजेत्या संघात अरशू साठे, सर्वेश्वर बेदाडे, फजल शेख, आदर्श गोरे, आशुतोष बाबर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट खेळ, आत्मविश्वास आणि संघभावनेचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली.या यशामागे क्रीडा शिक्षक मंडले सर, सुजित शेळके, प्रा. नारायण सोलकर यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण सराव महत्त्वाचा ठरला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर यांनी त्यांचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून पालक व शिक्षकवर्गातूनही विजेत्या संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चौका येथे दुष्काळ व पाणी परिषद संपन्न; १० ठराव सर्वानुमते मंजूर



**चौका :** त्रैमासिक तिफण, शिवार संसद व सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती यांच्या वतीने मौजे चौका येथे दुष्काळ व पाणी परिषद संपन्न झाली. छत्रपती संभाजीनगर शहराला मोठ्या प्रमाणात दूध, भाजीपाला व अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या या गावात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ज्येष्ठ शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते श्री घुगे सर अध्यक्षस्थानी होते. मंचावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे यांची उपस्थिती होती.प्रारंभी सर्व शेतकऱ्यांची मते दुष्काळ व विविध प्रश्नांवर जाणून घेण्यात आली. त्यानंतर दगडूभाऊ वाघ, रामभाऊ डोंगरे, संतोषराव वाघ, अमोल वाघ, राजू वाघ आदी शेतकऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त करून समस्या मांडल्या. इतरही शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीवर मत व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे यांनी मनोगते व्यक्त केली.परिषदेचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी या सर्व प्रश्नांचा उहापोह करून आगामी काळात या गावाशिवारात सर्वांनी एकत्र येऊन समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर चर्चा केली. "चौका हे गाव आदर्श गाव म्हणून मॉडेल उभे करू" असेही ते म्हणाले.डॉ. अश्विन रांजणीकर म्हणाले की, "सर्वांनी एकत्र येऊन आपल्या विकासासाठी प्रयत्न करावेत. आजीवन विस्तार विभाग आपल्या सोबत असून या गावात अनेक उपक्रम राबवून विकासासाठी हातभार लावू. त्यासाठी चौका हे गाव दत्तक घेऊ" असे त्यांनी जाहीर केले. अध्यक्षीय समारोप घुगे सर यांनी केला.यावेळी डॉ. रामचंद्र झाडे यांच्या अध्यक्षतेखाली शेती, पाणी प्रश्न, दुष्काळ आदी विषयांना वाचा फोडणारे कविसंमेलन संपन्न झाले. संजय गायकवाड, संजय शिंदे, रामदास घोडके, प्रकाश साळवे, रामचंद्र झाडे आदींनी कविता सादर केल्या. संत भगवान बाबा कला मंचने प्रबोधनात्मक व क्रांतिकारी गीते सादर केली.या परिषदेत शेवटी संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी ठरावांचे वाचन केले. यावेळी खालील १० ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले:१. संपूर्ण कर्जमाफी व उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव द्यावा.२. सुखना नदी पात्रातील बेकायदा वाळू उपसा तात्काळ बंद करून जेसीबी-ट्रॅक्टर जप्त करावेत व नदीचे खोलीकरण व गाळ काढून पुनरुज्जीवन करावे.३. सुखना नदीवरील बेकायदा बंधारे हटवून नळपाणी योजना सुरू करावी.४. चौका येथे तात्काळ चारा छावणी सुरू करून प्रति जनावर १० किलो चारा मोफत द्यावा.५. मनरेगातून २०० दिवस काम व रोज ४०० रुपये मजुरी देऊन शिवाराचीच कामे द्यावीत.६. सॅटेलाइट आधारे पाहणी करून एकरी ५० हजार रुपये थेट नुकसान भरपाई द्यावी.७. गावातच स्थानिक प्रक्रिया उद्योग व रोजगार निर्मिती करून स्थलांतर थांबवावे, दूध प्रक्रिया उद्योग येथे सुरू करावेत.८. खानदेश एक्सप्रेस हायवेसाठी ५ पट मोबदला, एका कुटुंबास नोकरी व सर्व्हिस रोड द्यावा.९. पाण्याच्या हक्कासाठी व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कायमस्वरूपी शिवार संसदेस मान्यता द्यावी व तीव्र आंदोलन उभारावे.१०. विचारांची पेरणी करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करावेत.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले तर आभार सरपंच संतोषराव वाघ यांनी मानले. या परिषदेत अनेक शेतकरी, दूध व्यावसायिक, मजूर यांची उपस्थिती होती.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६

# कसं जगावं आता? कोणत्या आशेवर जगावं? एका शेतकऱ्याच्या मुलाच्या स्वप्नाची गोष्ट

एका बाजूला दुष्काळाने शेतकऱ्याच्या शेतातली माती कोरडी पडली आहे. पिकासाठी पाऊस नाही, हातात पैसा नाही, डोक्यावर कर्ज आहे. आणि दुसऱ्या बाजूला आपल्या आयुष्याला दिशा मिळावी म्हणून वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवरच प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.हा प्रश्न फक्त MPSC देणाऱ्या विद्यार्थ्यांचा नाही, हा प्रश्न त्या प्रत्येक आई-वडिलांचा आहे, ज्यांनी आपल्या मुलाच्या स्वप्नासाठी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवल्या.एखाद्या शेतकऱ्याचा मुलगा गावातून शहरात येतो. खिशात फारसे पैसे नसतात, पण डोळ्यांत मोठं स्वप्न असतं. तो स्वतःला म्हणतो, “मला अधिकारी व्हायचं आहे.” फक्त स्वतःसाठी नाही, त्याला वाटतं, “माझ्या आई-वडिलांनी आयुष्यभर शेतात राबलं, उन्हातान्हात कष्ट केले, आता त्यांना पुन्हा मजुरी करायला लावायची नाही.”आईने घरखर्चातून थोडे-थोडे पैसे वाचवलेले असतात. वडिलांनी कधी शेतातून, कधी मजुरीतून, कधी कर्ज काढून पैसे दिलेले असतात. कधी आई स्वतःसाठी नवीन साडी घेत नाही, कधी वडील स्वतःच्या औषधांवर खर्च कमी करतात, पण मुलाच्या फीची तारीख आली की पैसे कुठूनतरी उभे करतात. कारण त्यांच्या मनात एकच असतं, “आपलं मूल शिकतंय, उद्याला त्याचं आयुष्य आपल्यापेक्षा चांगलं असेल.”त्या पैशांमध्ये फक्त नोटा नसतात. त्यात आईची भूक असते, वडिलांचा घाम असतो, बहिणीच्या छोट्या-छोट्या इच्छा असतात, घराच्या गरजा थांबवलेल्या असतात, आणि सगळ्यात मोठं म्हणजे एका कुटुंबाची आशा असते.तो विद्यार्थी स्वतःचं आयुष्य बाजूला ठेवतोतो विद्यार्थीही मग स्वतःचं आयुष्य बाजूला ठेवतो. मित्र फिरायला गेले तरी तो अभ्यास करतो. सणाला घरी जाता येत नाही. कधी पैशांची कमतरता असते, कधी मानसिक ताण असतो. पण तो स्वतःला एकच सांगतो, “थोडं अजून सहन कर, एक दिवस सगळं बदलेल.”त्याला विश्वास असतो की आज मी संघर्ष करतोय, पण उद्या माझ्या आई-बाबांच्या चेहऱ्यावर समाधान असेल.आणि विश्वासच हादरतो तेव्हा...पण जेव्हा स्पर्धा परीक्षांच्या प्रक्रियेवर गैरप्रकार, भ्रष्टाचार किंवा पेपरफुटीसारखे आरोप समोर येतात, तेव्हा त्या विद्यार्थ्यांचा फक्त एक पेपर खराब होत नाही, त्याचा विश्वास हादरतो. कारण त्याने गमावलेली वर्षं परत येत नाहीत, त्याने खर्च केलेले पैसे परत येत नाहीत, त्याच्या आई-वडिलांनी केलेले कष्ट परत मिळत नाहीत. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्याच्या मनातली ती निरागस आशा पुन्हा तशीच निर्माण होणं कठीण होतं.मग तो स्वतःलाच विचारतो, “मी अजून किती अभ्यास करू? अजून किती वर्षं थांबू? अजून किती पैसे खर्च करू? आणि शेवटी माझ्या मेहनतीचा निर्णय खरंच माझ्या मेहनतीवर होणार आहे का?”हा प्रश्न खूप मोठा आहे. कारण एका श्रीमंत घरच्या मुलासाठी एक वर्ष वाया जाणं कदाचित फक्त एक वर्ष असू शकतं, पण एका गरीब शेतकरी कुटुंबाच्या मुलासाठी एक वर्ष म्हणजे घरावरचं आणखी एक वर्षाचं ओझं. आणखी फी, आणखी राहण्याचा खर्च, आणखी पुस्तकं, आणखी फॉर्म, आणखी प्रवास आणि आई-वडिलांच्या चेहऱ्यावर वाढणारी चिंता.कधी कधी आई फोन करून विचारते, “अभ्यास कसा चाललाय?” आणि मुलगा हसून म्हणतो, “छान चाललाय आई, यावेळी नक्की होईल.” पण फोन ठेवल्यावर त्याच्या डोळ्यात पाणी असतं. कारण त्याला माहीत असतं, आईला सत्य सांगितलं तर ती पुन्हा पैसे कुठून आणेल याचा विचार करेल, वडिलांना सांगितलं तर ते पुन्हा कर्ज काढतील. म्हणून तो स्वतःचं दुःख स्वतःमध्येच ठेवतो.हा फक्त पेपर नसतोहा विद्यार्थी फक्त परीक्षा देत नसतो, तो आपल्या संपूर्ण कुटुंबाच्या अपेक्षा घेऊन परीक्षा देत असतो. त्याच्या मागे एक शेत असतं, एक छोटंसं घर असतं, आईची प्रार्थना असते, वडिलांचा घाम असतो आणि एक स्वप्न असतं, “आपल्या मुलाने आपल्यासारखं आयुष्य जगू नये.”मग सांगा, या मुलाने कुठे जावं? ज्याने शेती सोडून शिक्षणावर विश्वास ठेवला, ज्याने मजुरीऐवजी पुस्तक हातात घेतलं, ज्याने गरिबी असूनही मोठं स्वप्न पाहण्याचं धाडस केलं, त्याने आता कोणावर विश्वास ठेवायचा?गरीब असणं हा गुन्हा नाहीव्यवस्था जर पारदर्शक नसेल, तर मेहनतीने अभ्यास करणाऱ्या मुलाने स्वतःला दोष द्यायचा का? गरीब घरात जन्माला आला म्हणून त्याची स्वप्नं छोटी असावीत का? शेतकऱ्याचा मुलगा आहे म्हणून त्याने फक्त शेतीच करावी का? आई-वडिलांकडे पैसे नाहीत म्हणून त्यांच्या मुलाला मोठं स्वप्न पाहण्याचा अधिकार नाही का?नाही. कारण या देशाच्या प्रत्येक गरीब मुलाला स्वतःचं आयुष्य बदलण्याचा अधिकार आहे. त्याला फक्त नोकरी नको आहे, त्याला सन्मानाने जगण्याची संधी हवी आहे. त्याला कोणाची दया नको आहे, त्याला त्याच्या मेहनतीला न्याय हवा आहे.आज गरज आहे ती या विद्यार्थ्यांच्या आवाजाला ऐकण्याची. त्यांच्या वर्षांची किंमत समजून घेण्याची. त्यांच्या आई-वडिलांच्या कष्टांची किंमत समजून घेण्याची. कारण परीक्षा ही फक्त प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकेची गोष्ट नसते, कुणासाठी ती संपूर्ण आयुष्याची दिशा असते.एका विद्यार्थ्यांचं स्वप्न तुटलं की फक्त एक व्यक्ती हरत नाही, कधी कधी एका आईची आशा हरते, एका वडिलांचा विश्वास हरतो, एका कुटुंबाचं भविष्य थांबतं.म्हणून प्रश्न आजही तोच आहे, कसं जगावं आता? कोणत्या आशेवर जगावं?उत्तर एवढंच असावं, ही मुलं हरली नाहीत पाहिजेत. त्यांची स्वप्नं हरली नाहीत पाहिजेत. त्यांचा मेहनतीवरचा विश्वास हरला नाही पाहिजे. कारण परिस्थिती कितीही कठीण असली, तरी एका शेतकऱ्याच्या घरातून निघालेलं स्वप्न कुणाच्या गैरप्रकारापेक्षा मोठं असतं.आणि शेवटी, गरीब असणं हा गुन्हा नाही, शेतकऱ्याचा मुलगा असणं ही कमजोरी नाही, ओळख नसणं म्हणजे गुणवत्ता नसणं नाही. फक्त एवढीच अपेक्षा आहे, ज्याच्याकडे पैसा नाही, त्याच्याकडे तरी त्याच्या मेहनतीवर विश्वास ठेवण्याचा अधिकार राहू द्या. कारण या मुलांना सहानुभूती नको, त्यांना त्यांच्या कष्टाचा न्याय हवा आहे.



**साक्षी बाबुराव साळुंखे**
**शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी, कन्नड चतुर्थ वर्ष**

## कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ठाकरवाडी धरणातील मोटारी बंद करण्याची मागणी



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : तालुक्यातील निरगुडी बुद्रुक ठाकरवाडी मध्ये सद्या पिण्याच्या पाण्याची टंचाई चालू आहे त्यातच परिसरात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून, निरगुडी बुद्रुक ठाकरवाडी लघु धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे.वरुन येणारा पाणी प्रवाह बंद झाल्यामुळे सद्या 2-3 फुट पाणी कमी झाले आहे या पार्श्वभूमीवर धरणातील उपलब्ध पाणीसाठा सुरक्षित ठेवण्यासाठी पाण्याच्या मोटारी बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य,शाखा खुलताबाद तालुका यांच्या वतीने याबाबत ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बुद्रुक खुर्द तसेच तहसील कार्यालय, खुलताबाद येथे निवेदन देण्यात आले.धरणातील पाण्याचा मोठ्या प्रमाणात गॅस पाईपाद्वारे अवैध उपसा सुरू आहे त्याचबरोबर मोटारी द्वारे सुद्धा पाणी उपसा जोरात चालू आहे असेच सुरु राहील्यास भविष्यात परिसरातील नागरिक तसेच पशुधनासाठी पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणातील पाण्याच्या मोटारी तसेच गॅस पाईपद्वारे होणारा पाण्याचा उपसा तात्काळ बंद करून उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.कोरड्या दुष्काळाच्या परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे असून, प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन संबंधित ठिकाणी पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुका या फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६


# चौकाच्या शिवारात दुष्काळाविरुद्ध एल्गार

महाराष्ट्राच्या दुष्काळाच्या नकाशावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चौका हे नाव नेहमीच चर्चेत असते. छत्रपती संभाजीनगर या महानगराला दररोज हजारो लिटर दूध, टनांनी भाजीपाला आणि अन्नधान्य पुरवणारे हे गाव, आज मात्र स्वतःच्याच पाण्यासाठी संघर्ष करत आहे. याच पार्श्वभूमीवर त्रैमासिक तिफण, शिवार संसद आणि सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे चौका येथे एक ऐतिहासिक दुष्काळ व पाणी परिषद रविवारदि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी संपन्न झाली.ही केवळ बैठक नव्हती, तर शेतकऱ्यांच्या मनातील खदखद बाहेर काढणारी शिवार संसद होती.सारोळा फाट्यावर चौका गावाच्या शिवारात दुपारी एक वाजता सुरू झालेल्या या परिषदेला शेतकरी, शेतमजूर, दूध व्यावसायिक, आणि तरुणांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. दुष्काळाने होरपळलेला शेतकरी आपली व्यथा मांडण्यासाठी आतुर होता.व्यासपीठावर विचार आणि अनुभवपरिषदेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक, पुरोगामी विचारांचे अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री घुगे सर होते. त्यांच्या अध्यक्षतेखालीच या लढ्याला वैचारिक दिशा मिळाली.मंचावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत तिफण त्रैमासिकाचे संपादक आणि या चळवळीचे प्रणेते डॉ. शिवाजी हुसे, ज्येष्ठ साहित्यिक व कवी डॉ. रामचंद्र झाडे आणि इतिहास अभ्यासक डॉ. के. एल. भानुसे यांची उपस्थिती होती.सुरुवातीला गावकऱ्यांकडून थेट संवाद साधण्यात आला. कोणतीही औपचारिकता न ठेवता, प्रत्येक शेतकऱ्याला आपले मत मांडण्याची संधी देण्यात आली.शेतकऱ्यांच्या थेट मनोगतातून वास्तवदगडूभाऊ वाघ म्हणाले, "गेल्या तीन वर्षापासून सुखना नदीला पाणीच नाही. वाळू माफियांनी नदीच फोडून खाल्ली. पाणी आडवा, पाणी जिरवा म्हणता, पण पाणीच नाही तर जिरवणार काय?"रामभाऊ डोंगरे यांनी चारा टंचाईचा प्रश्न मांडला. "एका जनावराला दिवसाला 10 किलो चारा लागतो, बाजारात 200 रुपये मोजावे लागतात. दूधाला भाव 28 रुपये. जगायचे कसे?"सरपंच संतोषराव वाघ, युवा शेतकरी अमोल वाघ, राजू वाघ यांनी मनरेगा, पीकविमा, आणि हायवे भूसंपादनाचे प्रश्न मांडले. नळपाणी योजना बंद असल्याने रोज 2 किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याची व्यथा मांडली.या प्रसंगी डॉ. रामचंद्र झाडे आणि डॉ. के. एल. भानुसे यांनी अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. डॉ. झाडे म्हणाले की, दुष्काळ हा केवळ निसर्गाचा नसून तो व्यवस्थेने निर्माण केलेला आहे. पाण्याचे नियोजन चुकले की दुष्काळ येतो.दोन महत्त्वाच्या घोषणा - आदर्श गाव आणि दत्तक गावपरिषदेचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी सर्व प्रश्नांचा आढावा घेतला. ते म्हणाले, "चौका हे केवळ एक गाव नाही, तर मराठवाड्याच्या शेती व्यवस्थेचे प्रतीक आहे. इथे दूध आहे, शेतकरी कष्टाळू आहे, पण धोरण नाही. येत्या काळात आपण सर्वांनी एकत्र येऊन समाजोपयोगी उपक्रम राबवायचे आहेत. श्रमदानातून तलाव खोलीकरण, शिवारात वृक्ष लागवड, सेंद्रिय शेतीचे प्रयोग करू. चौका हे गाव आदर्श गाव म्हणून मॉडेल उभे करू."त्यांच्या या आवाहनाला डॉ. अश्विन रांजणीकर यांनी मोठी साथ दिली. ते म्हणाले, "विद्यापीठाचा आजीवन अध्ययन विभाग हा फक्त वर्गात शिकवण्यासाठी नाही, तर शिवारात उतरून काम करण्यासाठी आहे. सर्वांनी एकत्र येऊन आपल्या विकासासाठी प्रयत्न करावेत. आजीवन विस्तार विभाग आपल्या सोबत असून या गावात आरोग्य, शिक्षण, कृषी, कौशल्य विकासाचे अनेक उपक्रम राबवू. त्यासाठी मी आज जाहीर करतो की, चौका हे गाव आम्ही दत्तक घेत आहोत." त्यांच्या या घोषणेनंतर दुष्काळ परिषदेत टाळ्यांचा कडकडाट झाला.अध्यक्षीय समारोपात घुगे सर म्हणाले की, लढा हा केवळ मागणीसाठी नसून विचारांच्या पेरणीसाठीही असला पाहिजे. ही परिषद केवळ प्रश्न मांडण्यासाठी नाही तर प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आहे. कवितेतून आणि गीतांतून वैचारिक जागरदुपारच्या सत्रात डॉ. रामचंद्र झाडे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन संपन्न झाले. शेती, पाणी, दुष्काळ आणि आत्मसन्मान या विषयांवर कवींनी कविता सादर केल्या. संजय गायकवाड, डॉ. संजय शिंदे, रामदास घोडके, प्रकाश साळवे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी आपल्या कवितांनी उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले.त्यानंतर संत भगवान बाबा कला मंचच्या कलावंतांनी प्रबोधनात्मक आणि क्रांतिकारी गीते सादर करून वातावरण भारावून टाकले. "उठा उठा शेतकऱ्यांनो, पाण्यासाठी लढा" या गीतावर सर्वांनी हात उंचावून साथ दिली.परिषदेचा आत्मा - 10 ठरावया परिषदेचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शेवटी मंजूर करण्यात आलेले 10 ठराव. हे ठराव केवळ कागदावर नाहीत, तर पुढील आंदोलनाची दिशा आहेत. संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी ठरावांचे वाचन केले आणि सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले.1. संपूर्ण कर्जमाफी व हमीभाव:शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी आणि स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव कायद्याने लागू करावा.2. सुखना पुनरुज्जीवन: सुखना नदी पात्रातील बेकायदा वाळू उपसा तात्काळ बंद करून जेसीबी-ट्रॅक्टर जप्त करावेत व नदीचे खोलीकरण व गाळ काढून तिचे पुनरुज्जीवन करावे.3. बंधारे हटवा, नळयोजना सुरू करा: सुखना नदीवरील बेकायदा बंधारे आणि अडवणुकी हटवून मूळ प्रवाह सुरळीत करावा व गावाची बंद असलेली नळपाणी योजना तात्काळ सुरू करावी.4. चारा छावणी: चौका येथे तात्काळ शासकीय चारा छावणी सुरू करून प्रति जनावर 10 किलो चारा मोफत द्यावा.5. मनरेगा बळकट करा: मनरेगातून 200 दिवस काम, रोज 400 रुपये मजुरी देऊन शिवाराचीच कामे - बांधबंदिस्ती, शेततळे, वृक्ष लागवड द्यावीत.6. थेट नुकसान भरपाई: पारंपरिक पंचनाम्याला फाटा देऊन सॅटेलाइट आधारे पीक पाहणी करून एकरी 50 हजार रुपये थेट नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.7. स्थलांतर थांबवा, प्रक्रिया उद्योग आणा: गावातच स्थानिक प्रक्रिया उद्योग व रोजगार निर्मिती करावी, विशेषतः दूध प्रक्रिया, भाजीपाला डिहायड्रेशन उद्योग सुरू करून तरुणांचे स्थलांतर थांबवावे.8. हायवेला न्याय्य मोबदला: प्रस्तावित खानदेश एक्सप्रेस हायवेसाठी शेतकऱ्यांना बाजारभावाच्या 5 पट मोबदला, एका कुटुंबास एक नोकरी व शेतात जाण्यासाठी सर्व्हिस रोड द्यावा.9. शिवार संसदेला मान्यता: पाण्याच्या हक्कासाठी व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कायमस्वरूपी शिवार संसदेस ग्रामसभेप्रमाणे शासकीय मान्यता द्यावी व मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन उभारावे.10. विचारांची पेरणी: केवळ भौतिक विकास नाही, तर विचारांची पेरणी करण्यासाठी तिफण कविता दरबार, व्याख्याने व प्रबोधनात्मक कार्यक्रम कायमस्वरूपी आयोजित करावेत.या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले तर आभार सरपंच संतोषराव वाघ यांनी मानले. शेवटी सर्वांनी सुखना नदी वाचवण्याची आणि गावाच्या विकासासाठी एकजुटीने लढण्याची शपथ घेतली.ही परिषद संपली असली तरी चौकाच्या शिवारात एका नव्या लढ्याची आणि नव्या आशेची पेरणी नक्कीच झाली आहे. लवकरच एक निवेदन शासन व प्रशासनास देण्यात येणार आहे. या परिषदेसाठी शेतकरी, दुध उत्पादक शेतकरी, शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. शिवाजी हुसे संस्थापक - अध्यक्षसुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती**

# मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघासाठी माजी समाजकल्याण सभापती तथा उद्योजकसुदामराव सदाशिवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**जालना :** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जालना जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती तथा उद्योजक सुदामराव सदाशिवे यांनी आज मंगळवारी (दि.६) औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सुदामराव सदाशिवे हे भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव कोलते (मुक्काम) येथील रहिवासी असून, त्यांनी सामाजिक, शैक्षणिक तसेच सहकार क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी जालना जिल्हा परिषदेत समाजकल्याण सभापती म्हणून काम केले आहे. तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यासह विविध संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.सुदामराव सदाशिवे यांनी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळाशी संबंधित जबाबदाऱ्याही सांभाळल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे.शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात योगदान:सदाशिवे यांच्या पुढाकारातून भोकरदन, जाफराबाद आणि परिसरात विविध शैक्षणिक संस्था उभारण्यात आल्या आहेत. ते सम्राट अशोक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून, या संस्थेच्या माध्यमातून लुंबिनी विद्यालय, कुंभारझरी ता. जाफ्राबाद जि. जालना.दिपभारती माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, (कला शाखा), माहोरा ता. जाफ्राबाद जि. जालना.दिपभारती माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, (कला शाखा), वडोद तांगडा,ता. भोकरदन जि. जालना.दिपभारती माध्य, व उच्च माध्य. विद्यालय, (कला, विज्ञान शाखा), दानापूर,ता. भोकरदन जि. जालना सुरू आहे. तसेच मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह यांचा समावेश आहे. याशिवाय रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने रेडीमेड गारमेंट्स उत्पादन प्रकल्प उभारून सुमारे २०० महिला व पुरुष कामगारांना प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.सामाजिक क्षेत्रातही त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. सामूहिक विवाह सोहळे, महापुरुषांच्या जयंती उत्सवांचे आयोजन, लोकजागृती, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, ग्रामस्वच्छता आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपक्रम आयोजित केले जातात. उमेदवारी अर्ज दाखल करताना पदवीधर मतदार, समर्थक आणि विविध सामाजिक घटकांची उपस्थिती होती. त्यांच्या उमेदवारीमुळे औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीला जालना जिल्ह्यातून एक नवा राजकीय पर्याय मिळणार आहे.चौकट:विशेष म्हणजे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष १९७२ ते १९७६ पर्यंत सुदामराव सदाशिवे हे विद्यार्थी होते.या शैक्षणिक वर्षात ते विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी देखील होते. या शैक्षणिक कालावधीत संपूर्ण मराठवाड्यातील तब्बल ७ हजार विद्यार्थी मिलिंद महाविद्यालयात अध्ययन करीत होते. त्यामुळे श्री. सदाशिवे हे संपूर्ण मराठवाड्यात परिचित आहेत.याच पार्श्वभूमीवर सुदामराव सदाशिवे यांनी औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६

# पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना साहसी कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक

**मुंबई /बीड (भगवंत पाळवदे) :** राज्याच्या पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना साहसी कामगिरीसाठी "मुख्यमंत्री शौर्य पदक" देण्यात येणार आहे. कर्तव्य बजावताना जोखीम पत्करून केलेल्या कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक विजेत्यांना रोख पन्नास हजार रुपये, पदक तसेच प्रशस्तीपत्र मिळणार आहे. या सन्मान योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. दरवर्षी महाराष्ट्र दिन १ मेच्या पुर्वसंध्येला मुख्यमंत्री शौर्य पदकांची घोषणा करण्यात येणार आहे. शौर्य पदकासह, रोख पन्नास हजार रुपये तसेच प्रशस्तीपत्र असे या सन्मानाचे स्वरूप असेल. दरवर्षी शौर्य पदकांची निश्चित अशी संख्या राहणार नाही. तर ती राज्यभरातील क्षेत्रीय स्तरावरील कामगिरींबाबतचे अहवाल आणि येणाऱ्या प्रस्तावांच्या अधीन राहून जाहीर केली जातील.महाराष्ट्रातील गडचिरोली व गोंदिया हे माओवाद प्रभावित जिल्हे आहेत. माओवाद, दहशतवाद, जातीय दंगली, संघटित गुन्हेगारी, तस्करी यासह अंतर्गत सुरक्षा व बाह्य हल्ल्यांपासून सुरक्षेची जबाबदारी महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी धाडसाने आणि शौर्याने पार पाडत असतात. पोलीस दलातील अधिकारी, अंमलदारांच्या धाडसाचे सन्मान करण्यासाठी केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून दरवर्षी शौर्य, राष्ट्रपती शौर्य आणि अशोकचक्र, किर्तीचक्र अशी विविध पदके दरवर्षी २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या दिवशी जाहीर केली जातात. भारतातील पश्चिम बंगाल, तमिळनाडू, तेलंगणा, मेघालय, मणिपूर, केरळम् अशा राज्यात पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी व कर्तव्यप्राती समर्पणाची दखल घेऊन पुरस्कार दिले जातात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री शौर्य पदक दिले जाणार आहे. या पुरस्कार निवडीसाठी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम निवड समिती असेल. या समितीकडे जिल्हास्तरावरून पोलीस अधीक्षक हे त्या परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याद्वारे, तर पोलीस आयुक्त पोलीस महासंचालकांकडे प्रस्ताव सादर करतील. शासनस्तरावर गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल. त्यानंतर हे प्रस्ताव गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केले जातील. मुख्यमंत्री शौर्य पदक मरणोत्तरही देण्याची तरतुद करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री शौर्य पदकासाठी निवड पद्धती, त्यासाठी समितीची रचना आणि अनुषांगिक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली.--००--

(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)वडार समाजाला मोठा दिलासा, गौण खनिज उत्खननाची मर्यादा दोनशेवरून पाचशे ब्रास करण्यास मंजुरी, अधिनियमात सुधारणा करणारपारंपरिक दगडफोडी आणि गौण खनिजाचे उत्खनन करून उपजिवीका करणाऱ्या वडार समाजाला मोठा दिलासा देणारा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार या समाजासाठी गौण खनिज स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) सवलत आता वार्षिक उत्खनन मर्यादा दोनशे ब्रास वरून, पाचशे ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सवलतीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे), नियम १९६८ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीचे योग्य पध्दतीने सनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ तयार करण्यात आले आहेत. या नियमानुसार वडार समाजातील पिढीजात हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या कुटुंबास त्यांच्या व्यवसायासाठी कोणत्याही खाजगी जमिनीतून किंवा आकारणी न केलेल्या सरकारी पडीक जमिनीतून वर्षाला दोनशे ब्रास पर्यंत कोणतेही स्वामीत्वधन न आकारता दगड, मातींचे उत्खनन करता येते. तथापि, अलिकडे दगड उत्खननात, वाहतूक, डिझेल, मजुरी आणि अवजारांचा खर्च वाढला आहे. यामुळे वार्षिक दोनशे ब्रास दगड, माती उत्खननातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वर्षभराच्या उपजीविकेसाठी तुटपूंजे ठरते. या समाजाचे आर्थिक उत्पन्न वाढावे, समाजातील मुलांना उत्तम शिक्षण, आरोग्य सुविधा आणि पक्क्या घरांची उपलब्धता व्हावी यासाठी या समाजाच्या विविध संघटनांनी उत्खननाची मर्यादा दोनशेवरून पाचशे ब्रास करण्यात यावी, अशी मागणी केली होती. या मागणीनुसार वडार समाज हा पिढ्यानपिढ्या दगडफोडी व उत्खननाच्या व्यवसायात गुंतलेला असल्याने, तसेच त्यांना मोठ्या व्यावसायिक खाणपट्टा धारकांशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन ही मर्यादा वार्षिक पाचशे ब्रास करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे वडार समाजातील कारागिरांना वर्षाकाठी किमान उत्पादक व्यवसाय मिळणार असून, त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. याचा या समाजातील पारंपरिक दगडफोडी, उत्खनन व्यावसायिकांना दिलासा मिळणार आहे. --००--

(उच्च व तंत्र शिक्षण विभाग) सीएम सृष्टी योजना : विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांमधील संशोधनाला चालना मिळणार राज्यात संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास, उद्योग संलग्न उच्च शिक्षण उत्कृष्ठता केंद्रे यांच्या माध्यमातून सार्वजनिक विद्यापीठे शासकीय महाविद्यालये, संस्था आणि तंत्रनिकेतनमध्ये संशोधनास चालना देण्यासाठी सीएम सृष्टी योजना ( CM-SRISTHI- Scheme for Research, Innovations and Technological Hubs In Higher Education Institutions) अंमलात आणण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्य शासनाने विकसित महाराष्ट्र २०४७ मध्ये उच्च आणि तंत्र शिक्षणाचा समावेश आहे. विकसित महाराष्ट्राचे ध्येय साकरण्यासाठी उच्च आणि तंत्रशिक्षणाचे योगदान महत्वाचे राहणार आहे. त्याचबरोबर नवनवीन तंत्रज्ञान विकसित होणे आणि उच्च तंत्रज्ञान अवगत असणारे मनुष्यबळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी सीएम सृष्टी योजना अंमलात आणण्यास मान्यता देण्यात आली. योजनेचा कालावधी २०२६-२७ ते २०३०-३१ असा असेल. त्यानंतर सविस्तर आढावा घेऊन योजनेत आवश्यक ते बदल करण्यात येतील. योजना खालील संस्थांत राबविणार - उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व सार्वजनिक विद्यापीठे, सर्व शासकीय उच्च आणि तंत्रशिक्षण संस्था, सर्व शासकीय तंत्रनिकेतने, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई, कॉंलेज ऑंफ इंजिअनिअरिंग तंत्रज्ञान विद्यापीठ, डॉं. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड या संस्थेत ही योजना राबवली जाणार आहे. योजनेचे घटक - योजनेत विद्यापीठांमधील उत्कृष्ठता केंद्रे स्थापन करणे अपेक्षित आहे. ही केंद्रे डीप टेक आणि फ्रंटिअर टेक्नॉंलॉंजी क्षेत्रातील संशोधनाकरिता मदत करतील. विद्यापीठात स्वतंत्र तंत्रज्ञान विभाग स्थापन करणे आवश्यक आहे. या विभागात पदव्युत्तर, डॉंक्टरोल तसेच पोस्ट डॉंक्टरोल संशोधन कार्यक्रमावर भर देण्यात येईल. शैक्षणिक प्रशिक्षण बाजाराच्या गरजांशी सुसंगत करण्यावर भर दिला जाईल. यासाठी उद्योगजगताशी भागीदारी करण्यावर भर असेल. राज्यातील तांत्रिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनना अत्याधुनिक करण्याची आवश्यकता आहे. पारंपरिक शिक्षण पध्दती बदलून इंडस्ट्री ५.० च्या गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम लागू करण्यात येतील. उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यावरही या योजनेत भर दिला जाणार आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आकर्षित करणे, आंतरराष्ट्रीय संस्थांना आकर्षित करणे, परदेशी विद्यापीठांच्या शाखा, कॅंम्पसचे सह-स्थानिकीकरण करणे यावर भर दिला जाणार आहे. मेटा विद्यापीठे, कृत्रिम बुध्दिमत्ता विषयातील उत्कृष्ठता केंद्रे, संशोधन निधी, संशोधन पार्क, कार्पोरेट सामाजिक दायित्व, मादी विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्र निधी यांचाही या योजनेत विचार केला जाणार आहे.योजनेच्या अंमलबजावणीची तत्वे - राष्ट्रीय आणि जागतिक मानकांशी तुलना करणे, उद्योग-व्यवसाय सहकार्य अपेक्षित आहे. परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार आवश्यक राहील.योजनेच्या कालावधीनंतर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर अथवा विद्यापीठाने आर्थिक भार उचलणे अपेक्षित आहे. योजनेचे सर्व प्राधान्य संशोधनाला राहिल, बांधकामे कमीत कमी राहतील. राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील अग्रगण्य संस्थांशी सहकार्य आणि मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. योजनेकरिता मार्गदर्शक तत्वे शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात येणार आहेत.योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. यामध्ये वित्त आणि नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव सदस्य असतील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेचे अध्यक्ष, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, उद्योग-शैक्षणिक भागीदारी तज्ञ, संचालक, उच्च शिक्षण, संचालक, तंत्र शिक्षण समितीचे सदस्य असतील. त्याचबरोबर या समितीत आयआयटी, मुंबई, आयआयएम, मुंबई आणि नागपूर, आयआयएसईआर, पुणे, टाटा इन्सिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, रसायन, तंत्रज्ञान संस्था, मुंबई, डॉं. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, संबंधित विषयातील तज्ञ यांचा आवश्यकतेनुसार समावेश करण्यात येईल. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक समितीचे सदस्य सचिव असतील. --००--

(गृह विभाग) पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणी नुकसानभरपाईच्या धोरणास मान्यतापोलीस कोठडीतील व्यक्तींच्या मृत्यू प्रकरणात त्यांच्या जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतच्या धोरणास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या धोरणानुसार पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मारहाण, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास जवळच्या वारसदारास ५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. अशा व्यक्तिस शारिरीक किंवा मानसिक छळामुळे पन्नास टक्क्यांहून कमी कायमस्वरुपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास दोन लाख आणि त्याहून अधिक प्रमाणात अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास चार लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. वयोमानानुसार, किंवा कोठडीत येण्यापूर्वीच्या जुन्या असाध्य आजाराने नैसर्गिकरित्या मृत्यू झाल्यास, अचानक उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती, स्वत:हून वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्यास, कोठडीतून पलायन करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास, अवाजवी मागणीसाठी उपोषण किंवा वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याने झालेला मृत्यू या परिस्थितीत ही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. याशिवाय या धोरणात प्रशासकीय निष्काळजीपणाचे स्वरुप, वैद्यकीय तपासण्या, संबंधत प्रमाणपत्रे, अपंगत्वाची पडताळणी, याशिवाय कागदपत्रे व त्यांची पडताळणीचे नियमही व नुकसान भरपाई पद्धतीचे प्रस्ताव सादर करण्याची पद्धती निश्चित करण्यात आली आहे. अशा घटनांची संबंधित जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त तीस दिवसांच्या आत दखल घेऊन याबाबत प्रस्ताव सादर करतील. कोठडीतील मृत्यूप्रकरणी प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक वेतनातून, निवृत्तीवेतनातून किंवा मालमत्तेतून नुकसानभरपाई रक्कम वसूल कऱण्याची तरतुदही धोरणात समाविष्ट करण्यात आली आहे.--००--

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अनुदानात वाढअनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील, शासकीय वसतिगृहासाठी पात्र असूनही वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या वार्षिक अनुदानात वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध महाविद्यालये व शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह आणि शैक्षणिक साहित्याच्या खर्चासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, ठाणे आणि नागपूर येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता एकूण ८० हजार रुपये वार्षिक अनुदान मिळणार आहे. यामध्ये भोजन भत्त्यासाठी ४२ हजार रुपये, निवास भत्त्यासाठी २८ हजार रुपये आणि निर्वाह भत्त्यासाठी १० हजार रुपये यांचा समावेश आहे.इतर महसूल विभागीय शहरांमध्ये तसेच उर्वरित ‘क’ वर्ग महानगरपालिका क्षेत्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ६८ हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात येईल. यामध्ये भोजन भत्ता ३७ हजार रुपये, निवास भत्ता २१ हजार रुपये आणि निर्वाह भत्ता १० हजार रुपये असेल. इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या हद्दीपासून ५ किलोमीटर परिसरातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एकूण ५७ हजार रुपये वार्षिक अनुदान मिळेल. यामध्ये भोजन भत्ता ३२ हजार रुपये, निवास भत्ता १७ हजार रुपये आणि निर्वाह भत्ता ८ हजार रुपये असेल.तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ५० हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात येईल. यामध्ये भोजन भत्ता ३० हजार रुपये, निवास भत्ता १३ हजार रुपये आणि निर्वाह भत्ता ७ हजार रुपये असेल.याशिवाय वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याकरिता दरवर्षी ८ हजार रुपये, तर अन्य शाखांतील विद्यार्थ्यांना दरवर्षी ४ हजार रुपये अतिरिक्त रक्कम देण्यात येणार आहे.--००--

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढसामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठीच्या अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील २३८८ अनुदानित वसतिगृहांमध्ये कार्यरत अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदारांच्या मानधनात वाढ होणार आहे.राज्यात अनुसूचित जातीतील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत एकूण २३८८ अनुदानित वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये मुलांसाठी १८०४ आणि मुलींसाठी ५८४ वसतिगृहांचा समावेश असून, या वसतिगृहांची एकूण विद्यार्थी क्षमता ९९ हजार ८५२ इतकी आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करता यावे, शाळागळतीचे प्रमाण कमी व्हावे आणि त्यांचा शैक्षणिक विकास व्हावा, हा या वसतिगृह योजनेचा उद्देश आहे.या वसतिगृहांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. त्यानुसार महानगर क्षेत्र तसेच अ आणि ब वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील वसतिगृहांमध्ये अधीक्षकांचे मानधन १० हजार रुपयांवरून २० हजार रुपये, स्वयंपाकींचे मानधन ८ हजार ५०० रुपयांवरून १७ हजार रुपये, मदतनीसांचे मानधन ७ हजार ५०० रुपयांवरून १५ हजार रुपये आणि चौकीदारांचे मानधन ७ हजार ५०० रुपयांवरून १५ हजार रुपये करण्यात येणार आहे. राज्यातील उर्वरित क्षेत्रातील वसतिगृहांसाठी अधीक्षकांना १५ हजार रुपये, स्वयंपाकींना १२ हजार रुपये, मदतनीसांना १० हजार रुपये आणि चौकीदारांना १० हजार रुपये सुधारित मानधन देण्यात येणार आहे.मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अनुदानित वसतिगृहांमध्ये महिला अधीक्षक आणि २४ तास पहारेकरी उपलब्ध असणे बंधनकारक करण्यात आले आहे.--००--

(आदिवासी विकास विभाग)पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतील भत्त्यांमध्ये सुधारणाअनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतील भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे याकरिता विभागामार्फत विभागीयस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर आणि ग्रामीण स्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यान्वित आहेत. विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने त्या प्रमाणात शासकीय वसतिगृहांतील उपलब्ध प्रवेश क्षमता कमी पडू लागल्याने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या परंतु शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी "पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" राबविण्यात येते. योजनेत इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण किंवा इयत्ता १० वी नंतरच्या दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या परंतु शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्ता यासाठी निश्चित केलेल्या दराने दरवर्षी एकत्रित अशी रक्कम डी.बी.टी.द्वारे त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. या योजनेतील भत्त्यांचे दर सन २०१८ मध्ये निर्धारित करण्यात आलेले आहेत. त्यानंतर या भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आलेली नव्हती. आदिवासी विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेता, तसेच महागाई निर्देशांकाचा विचार करता सदर योजनेंतर्गत भत्त्यांच्या रकमेत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता भत्त्यांचे सुधारित दर पुढीलप्रमाणे राहतील (कंसात जुने दर) मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्यांकरिता भोजन भत्ता -४२००० (३२०००), निवास भत्ता २८००० (२००००), निर्वाह भत्ता १०००० (८०००). एकूण ८०,०००.(६०,०००). इतर महसुली विभागीय मुख्यालय, क वर्ग महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता भोजन भत्ता-३७००० (२८०००), निवास भत्ता २१००० (१५०००), निर्वाह भत्ता १०००० (८०००) एकूण ६८०००(५१,०००).इतर जिल्हा ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता भोजन भत्ता ३२००० (२५०००), निवास भत्ता १७००० (१२०००), निर्वाह भत्ता ८००० (६०००) एकूण ५७०००. अन्य ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन भत्ता ३०००० (२३०००), निवास भत्ता १३००० (१००००), निर्वाह भत्ता ७००० (५०००) एकूण – ५००००. या शिवाय वैद्यकीय व अभियांत्रिकीय विद्यार्थ्यांना दरवर्षी ८०००/- रुपये व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी रु.४०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी एकरकमी देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०७ ऑक्टोबर २०२६


# पुस्तके वाचण्यावरून गदारोळ: स्वत:हून भिन्न असलेल्या विचारांची भीती का?

'माझे घर चारही बाजूंनी भिंतींनी बंदिस्त असावे आणि माझ्या खिडक्या बंद असाव्यात अशी माझी मुळीच इच्छा नाही. सर्व देशांच्या संस्कृतींचा वारा माझ्या घरात शक्य तितक्या मोकळेपणाने वाहावा असे मला वाटते, परंतु त्यांपैकी कोणत्याही वाऱ्याच्या झोतात उन्मळून पडण्यास मी नकार देतो.' महात्मा गांधींनी वैचारिक मोकळेपणा आणि सांस्कृतिक स्वायत्तता यांमधील सुंदर तोल अधोरेखित करताना हे म्हटले होते. तथापि, ते ज्या राज्यातून येतात, तिथे अलिकडच्या काळात जे घडले, तोच या चर्चेचा मुख्य विषय आहे. अहमदाबाद येथील आनंद निकेतन शाळेत दोन पुस्तके शिकवण्यावरून जो काही प्रकार घडला, तो केवळ एका खासगी शैक्षणिक संस्थेपुरता मर्यादित असलेला वाद नाही; तर तो आपल्या लोकशाही ताण्याबाण्याला वाळवीसारखा हळूहळू पोखरणाऱ्या व्यापक वैचारिक आजाराचे लक्षण आहे. एका शाळेच्या ग्रंथालयात आणि बुक क्लबमध्ये नोबेल पारितोषिक विजेत्या मलाला युसुफझई यांचे आत्मचरित्र 'आय एम मलाला' आणि ज्यू नरसंहाराच्या भीषणतेवर आधारित ॲन फ्रँकचे प्रसिद्ध पुस्तक 'द डायरी ऑफ अ यंग गर्ल' उपलब्ध असण्यावरून उठलेल्या गदारोळाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, आपण अशा एका काळात जगत आहोत जिथे विचार, इतिहास आणि अस्वस्थ करणाऱ्या सत्यांना घाबरून त्यांना नष्ट करणे किंवा त्यांच्यावर बंदी घालणे हा सर्वात सोपा मार्ग मानला जात आहे. शाळेच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की ही पुस्तके अनिवार्य अभ्यासक्रमाचा भाग नव्हती, तर एका ऐच्छिक बुक क्लबचा आणि ग्रंथालयाचा भाग होती. असे असतानाही, काही विद्यार्थ्यांच्या पालकांनी असा दावा केला की, हे विद्यार्थ्यांना 'इतर धर्मांची पुस्तके' वाचण्यास भाग पाडण्यासारखे आहे. हा युक्तिवाद स्वतःतच हास्यास्पद आणि अत्यंत घातक आहे. ज्ञानाला कोणतीही सीमा किंवा धर्म नसतो. एकीकडे मलाला युसुफझई या जगभरात शिक्षणाच्या हक्काचा पुरस्कार करणाऱ्या आणि दहशतवादाविरोधात प्रखर विरोध दर्शवणाऱ्या अदम्य धैर्याच्या प्रतीक आहेत, तर दुसरीकडे ॲन फ्रँकची रोजनिशी नाझी अत्याचारांची आणि मानवतेच्या सर्वात काळ्या अध्यायाची एक हृदयद्रावक कहाणी आहे. ही पुस्तके केवळ हिंदुत्वाच्या धार्मिक किंवा वैचारिक चौकटीत बसत नाहीत म्हणून नाकारणे म्हणजे आपल्या शिक्षण व्यवस्थेला अंधकाराकडे ढकलण्यासारखे आहे. या संपूर्ण घटनेची सर्वात भयावह आणि वैचारिकदृष्ट्या समजून घेण्यासारखी बाजू म्हणजे तिचे स्त्री-विरोधी स्वरूप होय. ज्या दोन पुस्तकांना लक्ष्य करण्यात आले, ती दोन्ही पुस्तके स्त्रियांनी लिहिलेली आहेत हा काही योगायोग नाही. जेव्हा जेव्हा एखादा समाज किंवा राष्ट्र पुरुषसत्ताक, संकुचित आणि बहुसंख्याकवादी जातीयवादाच्या विळख्यात अडकते, तेव्हा त्याचा पहिला आणि अनिवार्य बळी स्त्रीची स्वायत्तता, तिचे शरीर आणि तिचा आवाज ठरतो. जातीयवादी आणि कट्टरतावादी शक्तींना नेहमीच या गोष्टीची भीती वाटते की स्त्रियांनी लिहायला, वाचायला आणि प्रश्न विचारायला सुरुवात केली, तर धर्म, संस्कृती आणि समाजाच्या मर्यादांच्या नावाखाली स्त्रियांना गप्प बसवणारी त्यांची ती कृत्रिम आणि दमनकारी व्यवस्था कोसळून पडेल. हा या गोष्टीचा पुरावा आहे की जातीयवाद हा केवळ दोन धर्मांमधील संघर्ष नसून, मुळात तो अशा प्रत्येक स्वतंत्र आवाजाविरुद्ध (विशेषतः स्त्रीच्या आवाजाविरुद्ध) पुकारलेले युद्ध आहे जो पुरुषसत्ताक आणि बहुसंख्याकवादी दाव्यांना आव्हान देतो. यानंतर शहरातील वस्त्रपूर येथील एका बागेत जेव्हा काही विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी या घटनेच्या निषेधार्थ एका 'सायलेंट रीडिंग' (मौन वाचन) सत्राचे आयोजन केले—ज्यामध्ये 'आय एम मलाला' आणि 'द डायरी ऑफ अ यंग गर्ल' व्यतिरिक्त जॉर्ज ऑर्वेलची हुकूमशाहीविरोधी अभिजात कृती '१९८४', भगतसिंग यांचे 'मी नास्तिक का आहे?' यांसारखी पुस्तके वाचली जात होती—तेव्हा त्यांच्यावर बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि इतर उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी हल्ला केला. हे या गोष्टीचा पुरावा आहे की आता केवळ पुस्तकांवर बंदी घालून भागत नाही, तर त्या बंदीविरोधात शांततापूर्ण मार्गाने आवाज उठवू पाहणारे लोकही सुरक्षित राहिलेले नाहीत. आधुनिकतेचा प्रकल्प दुर्बळ होत जाणे आणि धार्मिक अस्मिता राजकीयदृष्ट्या बळकट होत जाणे यांमुळे या प्रकारची समस्या वाढत चालली आहे. पुस्तकांवरील बंदी नवीन नाही अहमदाबादची ही घटना भारतीय संदर्भात पहिली नाही. भूतकाळाची पाने उलटली, तर १९८८ मध्ये सलमान रश्दी यांच्या 'द सॅटनिक व्हर्सेस' या पुस्तकावर घालण्यात आलेली बंदी हा देशातील पहिला मोठा प्रसंग होता. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन काँग्रेस सरकारने तुष्टीकरणाच्या राजकारणातून धार्मिक भावना आणि कायदा-सुव्यवस्थेचा हवाला देत त्यावर बंदी घातली होती. त्यानंतरच्या दशकांमध्ये ही प्रवृत्ती उत्तरोत्तर वाढतच गेली. जेम्स लेन यांच्या 'शिवाजी: हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या पुस्तकावर बंदी घालण्यात आली आणि मराठा अस्मितेचे राजकारण करणाऱ्या 'संभाजी ब्रिगेड'ने भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटवर हल्ला केला. त्यावेळच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्य सरकारने त्यांच्यावर चाप लावण्याऐवजी या प्रकाराला मूक पाठिंबा दिला. त्यानंतर ए. के. रामानुजन यांचा प्रसिद्ध निबंध 'थ्री हंड्रेड रामायणाज: फाईव्ह एक्झाम्पल्स अँड थ्री थॉट्स ऑन ट्रान्सलेशन', जो हिंदू महाकाव्य रामायणाच्या विविध रूपांतरांचे आणि सांस्कृतिक विविधतेचे शैक्षणिक विश्लेषण करत होता, अशाच दबावामुळे दिल्ली विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून वगळण्यात आला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांसारख्या उजव्या संघटनांच्या दबावापुढे तत्कालीन यूपीए सरकारला मान तुकवावी लागली. याच मालिकेत अमेरिकन इतिहासकार वेंडी डॉनिगर यांच्या 'द हिंदूज: ॲन अल्टरनेटिव्ह हिस्ट्री' या पुस्तकावरून 'दीनानाथ बात्रा आणि शिक्षा बचाओ आंदोलन समिती'ने केलेल्या निदर्शने आणि कायदेशीर कारवाईमुळे पेंग्विन या प्रकाशकाला अखेर बाजारातून पुस्तकाच्या प्रती मागे घ्याव्या लागल्या. त्याचप्रमाणे, जोसेफ लेलीव्हेल्ड यांनी महात्मा गांधींवर लिहिलेले चरित्र 'ग्रेट सोल' यावर तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील गुजरात सरकारने तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली होती आणि ते पुस्तक त्यांना अस्वस्थ करणारे वाटले होते. या सर्व घटनांचा साचा एकसारखाच आहे; जिथे सत्ता आणि कट्टरतावादी संघटना एकत्र येऊन अशा प्रत्येक विचाराला चिरडू पाहतात, जो त्यांच्या संकुचित राजकीय-सांस्कृतिक अजेंड्यात बसत नाही. 'बंदी'चे जागतिक चलन? या घटना केवळ भारतातच घडत आहेत असे नाही. हे एक विचित्र विडंबन आहे की जगातील सर्वात जुनी घटनात्मक लोकशाही मानल्या जाणाऱ्या युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेतील अनेक राज्यांमध्ये (विशेषतः टेक्सास, फ्लोरिडा, टेनेसी इत्यादी) गेल्या काही वर्षांत अल्पसंख्याक धर्म, वंशवाद, एलजीबीटीक्यू+ (LGBTQ+) मुद्दे आणि अमेरिकन इतिहासातील काळ्या अध्यायांशी संबंधित शेकडो पुस्तकांवर बंदी घालण्याची चढाओढ सुरू आहे. 'अमेरिकन लायब्ररी असोसिएशन'चे अहवाल सांगतात की शाळा आणि सार्वजनिक ग्रंथालयांमधून ती पुस्तके हटवली जात आहेत, जी बहुसंख्याकवादी भावनांना किंवा पुराणमतवादी राजकीय अजेंड्याला आव्हान देतात. याहून अधिक धक्कादायक आकडेवारी 'पेन अमेरिका' (PEN America) च्या 'द नॉर्मलायझेशन ऑफ बुक बॅनिंग' या अहवालात समोर आली आहे. या अहवालानुसार, एकट्या २०२४-२५ या वर्षात अमेरिकेतील २३ राज्यांमधील ८७ सरकारी (पब्लिक) शाळांमध्ये पुस्तकबंदीच्या एकूण २,३०४ घटना घडल्या आहेत. 'आम्ही विरुद्ध ते' या पलीकडे जाणे का गरजेचे आहे? आज पुस्तके धोक्यात का आहेत हे समजून घेण्यासाठी आपल्याला मानवी संस्कृतीने ज्ञानाचा विकास कसा केला हे पाहावे लागेल. इतिहास साक्षी आहे की कोणतीही महान संस्कृती शुद्धतावादी आग्रहांवर विकसित झाली नाही, तर तिने नेहमीच 'दुसऱ्या'चे विचार, तत्वज्ञान आणि साहित्य आत्मसात करून स्वतःला समृद्ध केले आहे. आठव्या ते तेराव्या शतकादरम्यानच्या इस्लामिक सुवर्णयुगात बगदाद येथे 'बैत-अल-हिक्मा' (ज्ञानाचे घर) ची स्थापना करण्यात आली होती. तिथे ग्रीक, पर्शियन, सिरियाक आणि भारतीय ग्रंथांचे अरबी भाषेत मोठ्या प्रमाणावर भाषांतर झाले. ॲरिस्टॉटल, प्लेटो, गॅलेन आणि युक्लिड यांचे तत्त्वज्ञान जतन केले गेले आणि त्यात मौलिक भाष्ये जोडली गेली. त्या काळातील विद्वानांनी जर असे म्हटले असते की 'हे ग्रीक किंवा पॅगन (मूर्तीपूजक) विचार आहेत, म्हणून आम्ही ते वाचणार नाही', तर युरोपकडे प्रबोधन युगासाठी कोणताही वैचारिक कच्चा माल उरला नसता. युरोपचे प्रबोधन, ज्याला आधुनिकतेचे प्रवेशद्वार मानले जाते, ते खरे तर अरबी आणि पर्शियन ग्रंथांच्या लॅटिन अनुवादांशिवाय अशक्य होते. आपण जर भारतीय उपखंडाच्या इतिहासावर नजर टाकली, तर इथेही ज्ञानाच्या देवाणघेवाणीची एक गौरवशाली परंपरा राहिली आहे. मध्ययुगीन भारतात मुघल सम्राट अकबराच्या काळात 'मकतब खाना' (अनुवाद विभाग) ची स्थापना झाली होती, ज्याअंतर्गत 'महाभारत', 'रामायण', 'पंचतंत्र' आणि 'राजतरंगिणी' यांसारख्या संस्कृतमधील महान ग्रंथांचे पर्शियन भाषेत व्यापक भाषांतर झाले. हीच परंपरा पुढे नेत सतराव्या शतकात मुघल राजकुमार दारा शुकोह यांनी भारतीय आध्यात्मिक चिंतनाचे शिखर गाठत वाराणसीच्या प्रकांड पंडित आणि संन्याशांच्या सहकार्याने ५२ उपनिषदांचे पर्शियन भाषेत भाषांतर करवून घेतले, ज्याला 'सिर्र-ए-अकबर' (महान रहस्य) म्हटले गेले. दारा शुकोह यांचा हा प्रयत्न या सखोल दार्शनिक आकलनावर आधारलेला होता की अद्वैत वेदांत आणि सूफीवाद या दोन्हीच्या केंद्रस्थानी एकाच अंतिम सत्याचा शोध आहे. त्यांनी उपनिषदांना 'आसमानी (दैवी) पुस्तकांचा मूळ स्रोत' मानले. भूतकाळात बौद्धिक शिखरावर असलेली माणसे इतर धर्मांचे ग्रंथ वाचण्यास कचरत नव्हती, याचाच हा पुरावा आहे. एका बहुलतावादी जगाची कठोर धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मितेच्या चौकटीत विभागणी होण्याची पायाभरणी आधुनिक राष्ट्र-राज्यांच्या उदयासोबत झाली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून जेव्हा वसाहतवादी प्रभाव आणि आधुनिकीकरणाचा दबाव वाढला, तेव्हा विविध समाज आणि धर्मांमध्ये एका प्रकारची बचावात्मक मानसिकता निर्माण झाली. या प्रक्रियेत 'आपण कोण आहोत?' यापेक्षा 'आपण कोण नाही?', म्हणजेच 'परका कोण आहे?' हे ठरवण्यावर अधिक भर दिला जाऊ लागला. राज्यसंस्था आणि तिच्याशी संबंधित वैचारिक गट असे गृहीत धरून चालू लागले की बाहेरचे किंवा वेगळे विचार समाजात शिरले, तर राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक शुद्धता धोक्यात येईल. आपला धर्म, संस्कृती आणि धर्मग्रंथ वाचवण्याच्या किंवा त्यांना श्रेष्ठ सिद्ध करण्याच्या चढाओढीत पुस्तकांना अस्मितेचे राजकीय प्रतीक बनवले गेले. इथूनच असा विचार जोर धरू लागला की आपल्या परंपरेव्यतिरिक्त इतर कोणत्याही विचारांचे किंवा धर्मांचे पुस्तक वाचणे म्हणजे आपल्या मूळ ओळखीशी केलेली प्रतारणा, विश्वासघात किंवा सांस्कृतिक वसाहतीकरण होय. सांस्कृतिक वसाहतवादाची ही भीती कितपत योग्य आहे, याची पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे.जर एखादा समाज आपल्या देशी भाषा, तत्वज्ञान आणि विज्ञान सोडून पूर्णपणे पाश्चात्त्य किंवा बाह्य साच्यात स्वतःला ढळू लागला, तर त्याची मूळ ओळख धोक्यात येते. या अर्थाने, आपल्या मुळांशी जोडलेले राहणे आणि वैचारिक आक्रमणापासून स्वतःचा बचाव करणे हे एका निरोगी राष्ट्राचे लक्षण आहे. परंतु जेव्हा आपण असे मानू लागतो की एखादा विचार किंवा पुस्तक केवळ यासाठी धोकादायक आहे कारण त्याचा लेखक वेगळ्या धर्माचा, राष्ट्राचा, लिंगाचा किंवा विचारसरणीचा आहे, तेव्हा आपण संस्कृतीच्या संरक्षणाच्या नावाखाली संकुचिततेच्या अशा विहिरीत उडी घेतो जी गुदमरवून टाकणारी असते. जेव्हा एखादा समाज असा दावा करतो की, तो दुसऱ्या धर्माच्या लेखकाचे विचार वाचल्याने भ्रष्ट किंवा दुर्बळ होईल, तेव्हा हे त्याच्या सामर्थ्याचे नव्हे, तर त्याच्या खोल वैचारिक असुरक्षिततेचे लक्षण असते. वैचारिक वसाहतवादाशी लढण्याचा मार्ग आपल्या सीमांवर उंच पहारे बसवून जगभरातील साहित्याला आपल्या उंबरठ्याबाहेर रोखणे हा निश्चितच असू शकत नाही.


**लेखिका प्रा. डॉ. आकांक्षा बरनवाल,**
**पाटलीपुत्र विद्यापीठ, पाटणा.**
**मराठी भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना.**



**सौजन्य : द वायर हिन्दी, १३/०९/२०२६**